**प्रेस नोट दिनांक २६/०७/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे.**

**गहाळ पर्स मुळ मालकाचे ताब्यात दिलेबाबत...**

इसम नामे रियाज भोलावाले यांना कागदीपुरा, कसबा पेठ, पुणे. या भागात असलेल्या कचराकुंडीत छोटी लेडीज पर्स मिळुन आल्याने त्यांनी सदरची पर्स ही लागलीच साततोटी पोलीस चौकी येथे पोलीस उप निरीक्षक महादेव लिंगे व पोलीस हवालदार अशोक जाधव यांचे ताब्यात दिली. त्यानंतर पोलीसांनी सदरची पर्स उघडुन ठेवली असता त्यामध्ये बँकेचे ए टी एम कार्ड, प्रियंका मोहिते नावाचे पॅनकार्ड, आधारकार्ड व इतर महत्वाची कागदपत्रे मिळुन आल्याने सदर कागदपत्राची पाहणी केली असता, त्यातील एका कागदावर प्रियंका मोहिते यांचा मोबाईल नंबर मिळुन आला. सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क साधुन त्यांची छोटी लेडीज पर्स मिळुन आले असलेबाबत कळविले असता प्रियंका मोहिते यांचे पती नामे श्री. योगेश मोहिते हे साततोटी पोलीस चौकी येथे आले. त्यावेळी त्यांनी सदर पर्स व त्यातील कागदपत्रांची पाहणी करुन ती पर्स पत्नी प्रियंका मोहिते हिचे असल्याचे सांगितले व त्यातील सर्व कागदपत्रे ही महत्वाची असल्याचे सांगितल्याने लागलीच साततोटी पोलीस चौकी येथे पर्स आणुन देणारे रियाज भोलावाले यांना बोलावुन घेवुन त्यांचे हस्ते सदरची पर्स ही योगेश मोहिते यांना सुपुर्त केली. त्यावेळी योगेश मोहिते यांनी पर्स चौकीमध्ये जमा करणारे रियाज भोलावाले व पर्स बाबत तात्काळ माहिती कळविणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक महादेव लिंगे व पोलीस हवालदार अशोक जाधव यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे.